# निसर्गाचे नियम

## सर्वांवर समान रूपाने लागू होणारी ब्रह्माण्डाची संचालन व्यवस्था

**संकलन : सी.ए. जयेश मोहनलाल शेठ | www.jayeshsheth.com**

● मी जे दिले आहे, तेच मला मिळत असते. मी जे दुसऱ्यांबद्दल चिंतेन तेच माझ्यावर घडेल.

● मी आत्मा आहे. हे शरीर, मला मिळालेली भुमिका (role) आहे. सामान्यत: आपल्याला ज्याचे आकर्षण असते, तशीच भुमिका आपल्याला मिळत असते.

● माझ्यावर जे काही आज घडतंय ते माझ्या भुतकाळाच्या कर्मांचे आरसा आहे. हे माझ्या पुर्वकृत कर्मांचेच फ़ळ आहे. जे कार्य मी मन-वचन-कायाद्वारे नाही केले, न करवून घेतले व अनुमोदन ही नाही केले, तसे कार्य माझ्या सोबत कधीही घडणार नाही.

● त्यामुळे एक गोष्ट नक्की आहे की, माझ्या सोबत भुतकाळात किंवा वर्तमानकाळात कोणताही अन्याय झालेला नाही, होत नाही व भविष्यकाळात होणार नाही. अशी समज आल्याने मी कोणत्याही तक्रारी शिवाय (No Complaint Zone) जगू शकणार . माझ्या बरोबर जे घडतंय ते माझ्या भुतकाळामुळेच घडतंय, त्यामुळे “माझ्या बरोबरच का?” (Why me?) हा प्रश्न उद्भवत नाही .

● मी माझं भाग्य (सदनशिब, good luck) पुण्य करुन व मोठया पापांचा (जुगार, दारु, मांसाहार, वेश्यागमन, चोरी, शिकार, व्यभिचार, कंदमूळ भक्षण, सुर्यास्थ नंतर जेवण करणे , लोणची खाणे , मध, अंजिर, लोणी वगैरे) त्याग करुन घडवू शकतो.

● हे समीकरण लक्षात ठेवावे की, पाप = दु:ख तसेच पुण्य = सुख.

● हे विचार अवश्य लक्षात ठेवायचे की मला दु:खातूनही सुखाचा (फायदा) अनुभव केला पाहिजे ,हे शिकायचे आहे.

● मी येथे कोणतीही अटी किंवा अपेक्षा न करता दुसऱ्यांना दयायलाच आलो . ह्या प्रमाणे देऊन मी माझं जुनं ऋण चुकवतो किंवा नवीन जमापुंजी साठवतो . दोन्ही प्रकारात फायदा माझंच आहे.

● मला माझं कर्तव्य उत्तम रीतीने पार पाडायचंय, दुसरेही असेच करतील ह्या आग्रह (अपेक्षा) न करता आपण सर्वांनी आपले कुटुंब, मित्रवर्ग, सहकर्मी, समाज व देशा साठी आपलं कर्तव्य आपली संपुर्ण शक्तिनुसार करावी .

● आपण स्वतः शिस्तप्रिय (कडक) व्हावे व दुसऱ्यां साठी उदार/दयाळू व्हायचे आहे.

● “जे होतं ते चांगल्यासाठीच होतंय” , हा सर्वोपरी सकारात्मकतेचा रस्ता आहे.

● इतरांसाठी माझी वागणूक खालील दिलेल्या चार प्रकारांची असली पाहिजे.
१) मैत्री :- सर्व जीवांसोबत मैत्री ठेवावी , त्यामुळे माझे कोणी शत्रू असणार नाही व सर्व जीवांचे चांगले व्हावे अशी इच्छा मनापासून करावे . अशा रीतीने माझा आनंद कायम राहील.
२) प्रमोदभाव :- दुसऱ्यांच्या सद्गुणांचे कौतुक केल्याने ते सद्गुण आपल्यातही यावे असे विचार करावे
३) करुणा :- पापींसाठी करुणा दाखवावी, कारण त्यांना ब्रम्हांडाच्या नियमांची माहिती नाही. त्यामुळे माझा मनोभाव चांगला राहील.

४) मध्यस्थता (प्रतिक्रिया नाही) :- जेव्हा कोणी आपणास त्रास देतो, दु:ख देतो तेव्हा मौनांत किंवां शांत रहावे, हृदयात आभार मानावे आणि त्या त्रासाचा स्वागत करावा (Thank You ! Welcome) हे तीन चरणांचे चिंतन करावे.

● प्रथम चरण : माझ्या पूर्वीच्या चुकांबद्दल मी क्षमा प्रार्थी आहे. (Sorry ! Sorry!)

● दुसरे चरण : मी हे नक्की करतोय की, मी दुसऱ्यांसोबत कधीही कोणत्याही प्रकारे दुर्व्यव्हार करणार नाही (Never Again!).

● तिसरे चरण : ज्यांनी मला दुःख दिले आहे , ते पूर्वी माझ्यामुळे केलेले व्वाईट कर्म स्वच्छ करतात असे विचारुन , मनातल्या मनात धन्यवाद द्यावे (Thank You!). त्यामुळे मला राग किंवा नावड किंवा निराशा होणार नाही आणि मी आनंदात राहणार , (Welcome!). ह्या प्रकारे मी परनिंदा आणि द्वेयषाचे विषचक्रापासून वाचणार व सकारात्मक विचारांत राहाणार .

● मला माझ्या वृत्तित विचार करुन बदल करायचा आहे, जबरदस्तीने नव्हे. त्यामुळे हा “सहजयोग” आहे, “हठयोग” नाही.

● मला माझ्या शरीराचा व मनाचा उपयोग मुक्ती साठी करायचा आहे. त्यासाठी प्रथम सम्यग्दर्शन (आत्मसाक्षात्कार)व्हायला पाहिजे . माझ्या जीवनाचे पहिले ध्येय म्हणजे “ सम्यग्दर्शनाची प्राप्ती व्हावी ” असे असायला पाहिजे . त्यासाठी सर्वात प्रथम सांसारिक ईच्छांचे त्याग आवश्यक आहे. घर-दार किंवां पैशाचा त्याग न करता,फक्त माझ्या मनात आलेल्या ईच्छांच्या व नावडींच्या दर दोन तासांत विचार करुन , त्यांवर “सुखी होने की चाबी”मधील १२ आणि वर दिलेल्या ४ भावनांची मदत घेउन त्या इच्छांना मुळातून नाश करायचा आहे.

● सत्य माझ्या आंतच आहे, ते शोधण्यासाठी बाहेर कोठेही जाण्याची आवश्यकता नाही.

● ज्यांना सत्याचा अनुभव झाला आहे, तेही दुसऱ्यांना वाट दाखवू शकतात. असे मनुष्य कधीही स्वत:ला विश्वाचा मायाजाळात फसवत नाही आणि ते कधीही ख्याति (प्रसिद्धी) व पैशाच्या माघे धावत नाही.

● सम्यग्दर्शनाची (आत्मसाक्षात्कार) प्राप्तीसाठी मी सत्याचा स्वीकार (ready to accept) व सत्यप्राप्तीसाठी स्वत:त बदल करण्यास तयार आहे (ready to change). मला माझ्यात बदल आणायचे आहे (ते सोपे आहे), इतरांत नाही जे फार कठीण आहे, कारण इतरांना बदलायला गेलो की आपल्याला फक्त आक्रोश, निराशा व उद्वेगच हाती लागते .

● मी नेहमी लक्षात ठेवीन की, प्रत्येक जीवात्म्या जवळ अनंतकाळ राहाण्यासाठी दोनच विकल्प आहेत. १) सिध्दावस्था [अनंतसुख], २) निगोद अवस्था [अनंत दु:ख]. मला सिध्दावस्थेसाठीच पुरुषार्थ करायला पाहिजे . नाहीतर निगोद अवस्था तर कोणत्याही प्रयत्नाशिवाय नक्कीच (by default) मिळते .

● मी स्वतःची तुलना दुसऱ्यांबरोबर कधिही करणार नाही, त्याचे ऐवजी मी माझे “आज”ला “काल” पासून सुखी करण्याचे प्रयत्न करीन . हाच दैनिक प्रगतिचा (daily progress) मार्ग आहे.

● वर दिलेल्या नियमांचे दररोज अनुसरण करावे आणि झोपण्यापूर्वी दिवसभरात ज्या क्षति-चुका झाल्या असतील त्यांना तपासून भविष्यात दुरुस्त करण्याचा प्रयत्न करावा.

-----

विस्तृत शिकवणुकीसाठी “सुखी होने की चाबी”व “सम्यग्दर्शन की विधि” ह्या पुस्तकांचा अभ्यास करावा.